# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यातील आदिवासी विभागाच्या आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना पोषण आहार मिळण्याबाबत**

**(१) १८१३ (३०-०१-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध ग्रामीण आदिवासी भागांमध्ये असलेल्या शासकीय आश्रमशाळांमध्ये आदिवासी विकास विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या पोषण आहारात दूध, अंडी, केळी व इतर फळे वाटप करण्यात येत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२०-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील यंत्रमाग व्यवसायात मंदी आल्याने कारखानदारांनी यंत्रमाग बंद ठेवल्याबाबत**

**(२) १९७३० (०५-०९-२०१५). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील यंत्रमाग व्यवसायात मंदी आल्याने कारखानदारांनी यंत्रमाग माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान २० दिवस बंद ठेवले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बंदमध्ये सहभागी मानससरोवर येथील यंत्रमाग व्यवसायिक महेश नसय्या बासा व गंगाराम राजमल्या बुदुल्ला यांनी यंत्रमाग बंद न ठेवल्याने चिडलेल्या सुरेश महेसुनी व त्याच्या तिघा मित्रांनी कारखान्यामध्ये कामगारांना मारहाण केली व कारखान्यातील विद्युत ट्युब फोडून लाखो रुपयांचे नुकसान केल्याचे उघडकीस आले आह, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१७-१०-२०१८) :** (१) होय.

(२) होय, सुरेश महेसुनी व त्याच्या तिघा मित्रांवर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(३) होय, सदर गुन्ह्याचा तपास पोलिस उपनिरीक्षक शेले यांनी केला असुन तपासात फिर्यादी यांनी फिर्यादीत आरोपी म्हणुन नावे नमुद केलेल्या इसमांनी सदरचा गुन्हा केला नसल्याचे व सदरची नावे मिळालेल्या चुकीच्या माहितीच्या आधारे दिले असल्याचे निष्पन्न झाल्याने मुळ आरोपीचा शोध लागलेला नाही. सदर गुन्ह्याची अ वर्ग समरी मंजुरीकरीता सादर करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आमगाव, देवरी, सालकेसा (जि.गोंदिया) तालुक्यातील प्रत्येक गावात पथदिवा योजना राबविण्याबाबत

**(३) ३५३९० (१६-०१-२०१६). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यातील आमगाव, देवरी, सालकेसा तालुक्यातील प्रत्येक गावात गाव तेथे पथदिवा ही योजना राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तीन तालुक्यातील ५० टक्के गावे येथे सदर योजनेपासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजना यशस्वीपणे राबविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (११-१०-२०१८) :** (१) व (२) गावा गावात पथदिवे लावण्याचे नियोजन व त्यासाठी आवश्यक योजना राबविण्याचे काम जिल्हापरिषद, गोंदिया तर्फे करण्यात येते.

(३) मार्च, २०१८ पर्यंत जिल्हा परिषद, गोंदियाकडून वर्ष २०१६-१७ पर्यंत मंजुरी प्राप्त झालेले सर्व पथदिव्यांची कामे पूर्ण झालेली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील उद्योजकांना वीज पुरवठ्याच्या असलेल्या समस्यांबाबत**

**(४) ४७२६३ (२०-०४-२०१६). श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वीज पुरवठ्याच्या असलेल्या समस्यांबाबत उपाययोजना करण्यासाठी मा.उद्योग मंत्र्यांनी माहे जानेवारी, २०१६ मध्ये उद्योजकांची बैठक मुंबईत आयोजित केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बैठकीस उर्जामंत्रीही उपस्थित होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्रातील विज दर, इतर शेजारी राज्याच्या तुलनेत महाग असल्याने राज्यातील उद्योग अन्य राज्यात स्थलांतरीत होत आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, परवडणाऱ्या विजेसाठी उद्योजकांनी रात्री वीज वापरण्याचा पर्याय शासनाने दिला आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर पर्याय उद्योजकांना स्विकारता येणार नाही व त्याबाबतच्या अडचणी उपस्थित उद्योजकांनी शासनापुढे मांडल्या आहेत, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, मेक-इन महाराष्ट्रासाठी उद्योजकांना वीज, पाणी व पायाभूत सुविधा शासनाने उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१४-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे आहे.

(५) हे खरे नाही.

(६) विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, डी व डी+ क्षेत्रातील औद्योगिक ग्राहकांना उद्योगांच्या कार्यक्षमतेवर आधारित व इंधन समायोजन आकार या सवलती दि. ०१.०४.२०१६ पासून देण्यात येत आहेत.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महावितरणाच्या वीजेचा वापर कसा होतो याची पडताळणी करण्याबाबत**
**नेमलेल्या संस्थेच्या अहवालाबाबत**

**(५) ४७९१० (२०-०४-२०१६). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरणच्या विजेचा शेतीसाठी वापर किती होतो याची पडताळणी करण्याची जबाबदारी मुंबई आयआयटीच्या "सेंटर फॉर टेक्नॉलॉजी अल्टरनेटीव फॉर रुलर एरिया" (सीटीएआरए) या संस्थेवर देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संस्था राज्यातील फिडरवर वीज वापराचे सर्वेक्षण आणि डेटा ॲनालिसिसचे व मिटर आणि विनामिटर वीज वापराचे सर्वेक्षण करणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतचा अहवाल सदर संस्था महावितरणला किती कालावधीत सादर करणार आहे व त्यानुषंगाने कृषीपंप ग्राहकांना देयके पाठविण्याबाबत महावितरणने कोणती सक्षम यंत्रणा कार्यान्वित केली आहे व त्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (११-१०-२०१८) :** (१), (२) व (३) कृषी ग्राहकांचा प्रत्यक्ष जोडभार, कृषी ग्राहकांचा प्रत्यक्ष वीज वापर आणि त्यांना देण्यात येणारी वीज देयके याचा अभ्यास करण्यासाठी तज्ञ व्यक्तींचा समावेश असणारी समिती महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनीअंतर्गत स्थापन करण्यात आली आहे. सदर तज्ञ समितीने आय.आय.टी मुंबई संस्थेमार्फत निवडलेल्या १०० कृषीपंप वाहिन्यांचे सर्वेक्षणाची माहिती विचारात घेऊन आपला अहवाल सूत्रधारी कंपनीस सादर केला. त्यावर महावितरणचे अभिप्राय घेण्यात आले असून सदरचा अहवाल सूत्रधारी कंपनीच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उल्हासनगर येथे नवीन वीज उपकेंद्र निर्माण करण्याबाबत

**(६) ४९३४८ (२१-०४-२०१६). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर हे औद्योगिक क्षेत्र असल्याने वीजपुरवठ्याची मोठी समस्या निर्माण झाली असल्याने नवीन सबस्टेशन निर्माण करून २२० के.व्ही.अ. उच्चदाबाची लाईनसाठी औडीनन्स फॅक्ट्री-अंबरनाथ यांच्या कडून मान्यता घेरुन आर.ए.पी.डी.आर.पी. योजनेअंतर्गतची कामे ठेकेदारांनी अपूर्ण ठेवली असल्याने पौलामाक्स कंपनीची मीटर जम्पिंग होत असून त्यासाठी समिती स्थापन करण्याची लोकप्रतिनिधी यांनी वीज मंडळाच्या संबंधित अधिकाऱ्यांना ऑक्टोबर, २०१६ रोजी विनंती करूनही अद्याप कोणतीही कामे केली नाहीत हे खरे आहे आहे,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (११-१०-२०१८) :** (१) २२० के.व्ही. उल्हासनगर उपकेंद्राच्या संलग्न वाहिनीस अंबरनाथ शस्त्रागार कारखान्याच्या परिसरातून उभारण्यास अद्याप शस्त्रागार कारखाना प्रशासनाकडून परवानगी मिळाली नसल्याने उपकेंद्राचे काम सुरु करता आलेले नाही.
(२) व (३) होय.

नियोजित २२० के.व्ही. उल्हासनगर उपकेंद्रासाठी २२० के.व्ही. पडघे-अंबरनाथ II (जांभूळ) वाहिनीवर लिलो पध्दतीने वाहिनी उभारणे प्रस्तावित आहे. अन्य मार्ग नसल्याने सदर वाहिनी अंबरनाथ शस्त्रागार कारखाना परिसरातूनच उभारणे अपरिहार्य आहे. त्यामुळे अंबरनाथ शस्त्रागार कारखान्याची प्रशासनाकडून परवानगीची आवश्यकता आहे. सदर परवानगी प्राप्त झाल्यावर वाहिनी व उपकेंद्र उभारणीचे काम सुरु करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शिष्यवृत्तीच्या निधीत होत असलेल्या गैरवापराकरिता 'टास्क फोर्स' ची स्थापना करण्याबाबत

**(७) ६७२२९ (२७-०१-२०१७). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शिष्यवृत्ती निधीत गैरवापर झाल्याने याप्रकरणी सखोल चौकशी करण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांनी ज्येष्ठ पोलीस अधिकारी डॉ.के.व्यंकटेशम यांच्या अध्यक्षतेखाली “टास्क फोर्स” ची स्थापना दिनांक १५ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या टास्क फोर्सने दिनांक २६ फेब्रुवारी, २०१६ व दिनांक ३० मे, २०१६ रोजी अनुक्रमे पहिला व दुसरा अहवाल राज्यांच्या मुख्य सचिवांना सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने आतपर्यंत कोणती कारवाई केली आहे,
(४) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (३०-१०-२०१७) :** (१) अंशतः होय.
(२) व (३) सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षामध्ये चंद्रपूर जिल्हयात शिष्यवृत्तीचे नोंदणीकृत अर्ज एकूण ५४४४९ इतके होते, त्यापैकी ५२१७८ इतक्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली. उर्वरीत १५८१ विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालयाकडुन प्राप्त झालेले नाहीत. विद्यार्थ्यांचे सदरील अर्ज त्वरेने निकाली काढण्याबाबत संबंधित महाविद्यालयांना आयुक्तालयामार्फत सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील महावितरण कंपनीद्वारा पुरविण्यात येणा-या वीज वितरण प्रणाली मध्ये सुधारणा करणेबाबत**

**(८) ७८४१८ (२८-०४-२०१७). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीद्वारा पुरविण्यात येणा-या वीज वितरण प्रणालीमध्ये सुधारणा करण्यासाठीचा प्रस्ताव मा.ऊर्जामंत्री महोदयांकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३१ जानेवारी, २०१५ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) वसई मंडळ अंतर्गत देखभाल व दुरुस्तीच्या कामाचा आराखडा महावितरणमार्फत मंजूर करण्यात आला असून व सदर कामे कंपनीच्या देखभाल-दुरुस्तीच्या उपलब्ध निधीतंर्गत करण्याचे प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर विभागांतर्गत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती देण्यात आली नसल्याबाबत**

**(९) ७९९७३ (२१-०४-२०१७). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर विभागाअंतर्गत अनू.जाती, अनु.जमाती, विमुक्त जाती व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिषयवृत्ती सन २०१४-१५ व २०१५-१६ या वर्षाकरिता देण्यात आली नसल्याची बाब दिनांक २० डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्षनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सन २०१४-१५ मध्ये २,८१,३७३ तर २०१५-१६ मध्ये ३,३८,९१५ विद्यार्थ्यांचे अर्ज प्रलंबित असल्याचे राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी निदर्शनास आणून दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१२-१०-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) नागपूर विभागाअंतर्गत ६ जिल्ह्यातील सन २०१४-१५ व सन २०१५-१६ या शैक्षणिक सत्रात अर्ज केलेल्या अनुक्रमे ३,६२,५१७ व ३,६४,०३१ विद्यार्थ्यापैकी माहे मार्च,२०१६ अखेर ३,३०,०६५ (सन २०१४-१५) व २,२१,०४० (सन २०१५-१६) विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली आहे.

त्यानंतर, त्यामधील माहे मार्च,२०१७ अखेरीस २,०५५ (सन २०१४-१५) व १,०३,१८८ (सन २०१५-१६) विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली असून, वर्षाखेरीस जिल्हास्तरावर प्रलंबित असलेले अर्जापैकी परिपूर्ण/ पात्र असलेले अर्ज निकाली काढण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य विज नियामक आयोगाने महावितरणच्या वीज ग्राहकांना दीड टक्का वीजदरवाढ लागू केली असल्याबाबत

**(१०) ८०८५३ (२८-११-२०१७). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य वीज नियामक आयोगाने महावितरणच्या वीज ग्राहकांना दीड टक्का दरवाढ लागू केली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही दरवाढ १ नोव्हेंबरपासून लागू होणार असून ती पुढील चार वर्षापर्यंत कायम राहणार असल्याने याचा सर्वात जास्त आर्थिक त्रास घरगुती ग्राहकांना होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे घरगुती ग्राहकांचा स्थिर वीज बिल आकार ५० वरुन ५५ रुपये होणार असून साधारणपणे पाच रुपयांची वाढ करण्यात असल्याने शासनाने घरगुती ग्राहकांसाठी लागु केलेली ही अन्यायकारक दरवाढ मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-१०-२०१८) :** (१), (२) व (३) राज्यातील वीज ग्राहकांचे वीज दर ठरविण्याचे अधिकार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास आहेत. आयोगाने बहुवर्षिय वीजदर दिनांक ०३.११.२०१६ रोजी सन २०१६-१७ ते २०१९-२० साठी जारी केले होते. सदर आदेशानुसार घरगुती ग्राहकांच्या वीज दरात सरासरी १.००% ते १.३% इतकी माफक दरवाढ करण्यात आली होती.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याबाबत

**(११) ८२७१० (२१-०४-२०१७). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना उत्तर प्रदेशाप्रमाणे कर्जमाफी देण्याची मागणी मा.मुख्यमंत्री यांचेकडे एका राजकिय पक्षाद्वारे दिनांक ०८ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (११-१०-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

सदर विषयाबाबतचे दिनांक ०७/०४/२०१७ चे श्री.अविनाश टनमने व इतर यांनी दिलेले निवेदन जिल्हादंडाधिकारी नांदेड यांच्याद्वारे शासनास प्राप्त झाले.

(२) राज्यातील शेतकऱ्यांची थकीत कर्जे माफ करण्यासंदर्भात शासन निर्णय दिनांक २८/०६/२०१७ अन्वये "छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना - २०१७" जाहीर केली असून योजनेचा लाभ देण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) विलंबाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### परांडा (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील महावितरणच्या कर्मचाऱ्यांकडून शेतकऱ्यांना नाहक त्रास दिला जात असल्याबाबत

**(१२) ८३४५७ (२८-११-२०१७). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परांडा (जि.उस्मानाबाद) तालुक्यात मौ. देऊळगांव येथे सलग चार दिवस तर मौ. घारगांव व मौ. राजुरी येथे सलग पाच दिवस पुर्णवेळ वीजपुरवठा खंडीत असल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शेतकऱ्यांनी अनेकवेळा विनंती करुनही व प्रत्यक्ष कार्यालयामध्ये जाऊन विनंती करुनही महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी दखल न घेतल्याने सदरील गावात सलग पाच दिवस वीजपुरवठा नव्हता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तद्‌नंतर सुमारे २०० पेक्षा जास्त शेतकरी जवळा (नि) सब स्टेशनमध्ये निवेदन देण्यासाठी गेले असता एकही अधिकारी त्याठिकाणी निवेदन स्विकारण्यासाठी उपस्थित नसल्याने ७ तास वाट बघितल्यानंतर शेतकरी नाईलाजाने तेथून निघुन गेल्याचे खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात येथील लोकप्रतिनिधींनी दिनांक २० फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यादरम्यान मा.उर्जामंत्री यांना लेखी निवेदनाद्वारे याची चौकशी करण्याबाबत व विद्युतपुरवठा तात्काळ सुरु करण्याबाबत विनंती केली, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.

सदर भागाचा विद्युत पुरवठा साधारणपणे दोन दिवस अतिभारामुळे विस्कळीत झाला होता.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

सदरहू उपकेंद्रात सदर उपकेंद्राचे प्रधान यंत्रचालक उपस्थित होते. उप कार्यकारी अभियंता उप विभाग, परांडा यांनी शेतकऱ्यांचे निवेदन परांडा उप विभागात स्विकारले.

(४) हे खरे आहे.

(५) सदर भागाचा विद्युत पुरवठा साधारणपणे दोन दिवस अतिभारामुळे विस्कळीत झाला होता व त्यासाठी अनुक्रमे नवीन ३३ के.व्ही. व ११ के.व्ही. जोडवाहिनी उभी करुन दुसऱ्या वाहिनीवर भार विभागणी करुन विद्युत पुरवठा सुरळीत करण्यात आला आहे.

---

## नांदूर (ता.आंबेगांव, जि.पुणे) येथे वीज मीटर जळाल्याने परिसरातील वीज पुरवठा बंद झाल्याबाबत

**(१३) ८६३९६ (०९-०८-२०१७). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदूर (ता.आंबेगांव, जि. पुणे) येथे दिनांक १५ मे, २०१७ रोजी ३३ के.व्ही उपकेंद्रात वायर एकत्र आल्याने स्फोट होऊन ५० वीज मीटर जळाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वीज मीटर जळाल्याने या परिसरात वीज पुरवठा बंद झाल्याने याबाबत स्थानिकांनी कळंब विज वितरण कंपनीच्या कार्यालयाशी संपर्क साधूनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-१०-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) मौजे नांदूर, ता.आंबेगाव या गावातील वीज पुरवठा ३३/११ के.व्ही उपकेंद्र कळंब येथून करण्यात येत असून दि. १५.०५.२०१७ रोजी ११ के.व्ही फुलेवाडी या उच्चदाब विद्युत वाहिनीची तार वादळी वाऱ्यामुळे तुटून मौजे नांदूर गावातील लघुदाब विद्युत वाहिनीवर

पडल्याने वीज प्रवाहातील दाब वाढल्याने सदर गावातील घरगुती वापराचे २६ मीटर व कृषीपंप ग्राहकांचे ७ मीटर असे एकूण ३३ मीटर जळाले होते. दिनांक १७.०५.२०१७ रोजी घरगुती वीज ग्राहकांचे २६ मीटर बदलून त्यांचा वीज पुरवठा सुरळीत चालू करण्यात आला. तसेच कृषीपंपाचा वीज पुरवठा देखील चालू करण्यात आलेला आहे. शिवाय ११ के.व्ही विद्युत वाहिनीची पूर्ण तपासणी करुन भविष्यात असा प्रकार होऊ नये म्हणून देखभालीचे काम सुध्दा पूर्ण करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गंगापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यात वीज न वापरताही शेतक-यांना हजारो रुपयांचे देयक पाठविल्याबाबत**

**(१४) ८६६२६ (०९-०८-२०१७). श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यात “महावितरण आपल्या दारी” ही योजना सुरू केली असता या योजनेसाठी अनेक शेतक-यांनी कृषीपंपाच्या वीज जोडणीसाठी ४ हजार ७२० रूपयांची अनामत रक्कम भरली असता लगेच या सर्व शेतक-यांना महावितरण कंपनीने प्रत्येकी ३० ते ५० हजार रूपयांचे व न वापरलेले वीज देयक पाठवल्याची माहिती दिनांक १६ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, न वापरलेल्या या वीज देयकासंदर्भात शेतकरी महावितरण कार्यालयात गेले असता अधिका-यांनी अगोदर वीजेच्या देयकाचा भरणा करण्यास सांगितले, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-१०-२०१८) :** (१), (२) व (३) ”महावितरण आपल्या दारी” या योजनेंतर्गत ज्या ग्राहकांना तात्काळ वीज जोडणीची आवश्यकता होती व केबलद्वारे लाईनवर आकडा टाकून जे वीजेचा वापर करीत होते अशा कृषीपंप धारकांनी कोटेशन भरल्यानंतर आहे त्या स्थितीत कोणतीही दंडात्मक कारवाई न करता वीज बिल सुरु करण्यात आले. सदर योजनेत कृषीपंप धारकांना वीज जोडणीसाठी महावितरणने पायाभूत उभारणी न करता ग्राहक वापरत असलेल्या केबलद्वारे वीज जोडणी करण्यात आली होती व वीजेच्या वापराप्रमाणेच वीज बिल देण्यात आलेली आहेत. तसेच ज्या ग्राहकांची केबल वारंवार कट होऊन वीज पुरवठा खंडीत होत असल्यामुळे केबल काढून घेतल्याचे आढळून आले त्या ग्राहकांची जानेवारी, २०१७ नंतरची बीले दुरुस्त करुन देण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कागल तालुक्यातील (जि.कोल्हापूर) वेदगंगा काठावरील गावांचा वीजपुरवठा बंद असल्याबाबत**

**(१५) ८७४०६ (०९-०८-२०१७). श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कागल तालुक्यातील (जि.कोल्हापूर) वेदगंगा काठावरील कौलगे व बानगे गावांचा वीजपुरवठा माहे एप्रिल, २०१७ मध्ये बंद केला असल्याने पाण्याअभावी सर्व पिके सुकून गेली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीजपुरवठा बंद असल्याने तेथील शेतकऱ्यांनी सोनगे (ता.कागल, जि.कोल्हापूर) येथील वीज वितरणाच्या कार्यालयावर मोर्चा काढून वीज सुरु करण्याबाबत मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत स्थानिक कार्यालयाने अद्यापी कोणतीच कार्यवाही केली नसून शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर वीजपुरवठा सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१०-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.

कौलगे व बानगे परिसरातील कृषीपंप वाहिनीवर माहे एप्रिल, २०१७ मध्ये तांत्रिक कारणास्तव अतिरिक्त भारनियमन करण्यात आले होते.

(२) हे खरे आहे.

(३) माहे एप्रिल, २०१७ मध्ये निर्माण झालेल्या वीजेच्या समस्यांचे निराकरण करुन दि.३०.०४.२०१७ पासून कौलगे व बानगे परिसरातील सर्व कृषी वाहिन्यांवरील कृषी ग्राहकांना रात्रीच्या काळात १० तास व दिवसा ८ तास थ्री फेज वीजेची उपलब्धता चक्राकार पध्दतीने देण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ७० हजार यंत्रमाग धारकांना वीज देयकात सवलत देण्याबाबत**

**(१६) ८९३८३ (०९-०८-२०१७). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ७० हजार यंत्रमाग धारकांना वीज देयकात सवलत देण्याबाबत व त्यांच्या कर्जावरील पाच टक्के व्याज पुढील पाच वर्ष राज्य शासनामार्फत भरण्याबाबतच्या प्रस्तावास शासनाकडून तत्वतः मंजूरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयाचे स्वरुप काय आहे व या निर्णयाबाबत राज्य शासनाने अंतिम निर्णय घेतला आहे काय व असल्यास, त्याची अंमलबजावणी कधीपासून होणार आहे,

(३) असल्यास, या निर्णयामुळे किती रक्कमेची शासनाला तरतूद करावी लागणार आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-१०-२०१८)** : (१), (२) व (३) शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र.१७५/ऊर्जा-५, दि. ७.११.२०१५ नुसार यंत्रमागधारकांना वीज दर सवलतीसाठी शासनामार्फत देण्यात येणाऱ्या अनुदानाची मर्यादा कायम ठेऊन वीज दरात होणाऱ्या वाढीचा भार संबंधित यंत्रमाग धारक ग्राहकांना आकारण्यात येत आहे. २७ अश्वशक्तीचा खालील यंत्रमागधारक ग्राहकांना रु.२.७७/- प्रती युनिट व २७ अश्वशक्तीचा वरील यंत्रमागधारक ग्राहकांना रु.४.२२/- प्रती युनिट वीजदर सवलतीसाठी शासनाकडून महावितरण कंपनीस अनुदान देण्यात येते. वार्षिक अनुदानाची रक्कम सुमारे रु.१२०० कोटी एवढी आहे.

---

**बदलापूर येथे राजकीय पक्षाच्या वतीने महावितरणच्या कार्यालयासमोर करण्यात आलेले आंदोलन**

**(१७) ९०८८१ (०९-०८-२०१७). श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूर (जि.ठाणे) येथे वीजपूरवठा वारंवार खंडित होत असूनही अवाजवी येत असलेली देयके तसेच मुदत संपल्यानंतर देयके प्राप्त होणे, मीटर वाचन उशीराने म्हणजे दीड ते दोन महिन्याने घेणे, परिणामी नेहमीपेक्षा देयके जास्त येणे, रोखीने देयके भरण्याच्या नावाखाली कर्मचा-यांकडून होत असलेली फसवणूक याविरोधात राजकीय पक्षाच्यावतीने महावितरणच्या कार्यालयासमोर माहे जून, २०१७ मध्ये वा त्या सुमारास आंदोलन करण्यात आले तसेच याबाबत तातडीने दखल घेऊन कारवाई करण्याची मागणी तेथील नागरिकांनी यासुमारास उपअभियंता, महावितरण बदलापूर (पुर्व) यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले,

(३) तदनुसार चौकशीच्या निष्कर्षानुसार जबाबदार असणा-या संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) ग्राहकांना येणाऱ्या अवाजवी देयकाच्या तक्रारी लक्षात घेवून ताबडतोब महावितरणच्या क्षेत्रिय कार्यालयामार्फत स्थळ तपासणी करुन १०८१ ग्राहकांची वीज बिले दुरुस्ती करुन देण्यात आली आहेत. मीटर वाचन घेणाऱ्या एजन्सीला योग्य रिडींग घेण्याचे निर्देश दिलेले आहेत.

(३) संबंधित प्रकरणात दोषी कर्मचाऱ्यांना निलंबित करुन त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशीची कारवाई चालू आहे. तसेच मीटर वाचन एजन्सीवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रंगराजन समितीच्या शिफारशीनुसार साखर कारखान्याच्या प्रत्येक वर्षाच्या उत्पादनातून ७५ टक्के रक्कम शेतकऱ्यांना अदा करण्याबाबत**

**(१८) ९२५३६ (१८-०८-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रंगराजन समितीच्या शिफारशीनुसार सह वीज निर्मिती प्रकल्प असलेल्या साखर कारखान्याच्या प्रत्येक वर्षाच्या उत्पादनातून ७५ टक्के रक्कम शेतक-यांना अदा करण्यात यावी अशी नोटीस साखर आयुक्तांनी १५० साखर कारखान्यांना माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान बजावली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, को-जनरेशन असलेल्या साखर कारखान्यांच्या प्रत्येक वर्षाच्या उत्पादनातून आलेल्या रक्कमेपैकी ७५ टक्के रक्कम शेतकऱ्यांना व २५ टक्के रक्कम प्रशासनावर खर्च करावी व को-जनरेशन नसलेल्या कारखान्यांनी ७० टक्के रक्कम ऊस उत्पादक शेतक-यांवर व ३० टक्के रक्कम प्रशासनावर खर्च करावी असा नियम असूनही सदर रक्कम शेतक-यांना मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, १५० साखर कारखान्यांपैकी किती कारखान्यांनी सदरची रक्कम ऊस उत्पादक शेतक-यांना दिली,

(४) तसेच ज्या कारखान्यांनी सदरची रक्कम ऊस उत्पादक शेतक-यांना दिली नाही त्यांच्यावर शासनाने कोणती कारवाइ केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०३-१०-२०१८) :** (१) नाही.

(२) व (३) महाराष्ट्र (कारखान्यांना पुरविण्यात आलेल्या) ऊसदराचे विनियमन अधिनियम २०१३ मध्ये महसूली उत्पन्न विभागणी (RSF) सूत्राबाबत खालील तरतूद आहे.

ऊस नियंत्रण मंडळास कलम ४ (क) नुसार FRP व्यतिरिक्त उत्पन्न विभागणीद्वारे ७०:३० किंवा ७५:२५ प्रमाणे ऊस पुरवठादारांना ऊसाचा दर ठरविणेचे अधिकार आहेत. सदर कलमानुसार "ऊसाचा दर निश्चित करताना बगॅस, मळी. प्रेसमड या उपपदार्थांच्या मुल्यासह साखरेच्या मूल्याच्या आधारे ७०% इतका ऊसदर राहील किंवा केवळ साखरेच्या मूल्यांच्या आधारे ऊसदर ७५% इतका राहील. या नुसार उत्पन्न विभागणी सूत्रानुसार ७०% किंवा ७५% प्रमाणे निघणारा दर ऊस पुरवठादारांना अदा करणे आणि ३०% किंवा २५% रक्कम कारखान्यांने खर्च करणे अशी तरतूद आहे.

हंगाम २०१६-१७ मध्ये १५० साखर कारखान्यांनी हंगाम घेतला होता. या कारखान्यांपैकी १४१ कारखान्यांचे RSF सुत्रानुसार दर निश्चित करणेकरीता प्रस्ताव प्राप्त झाले होते. सदर कारखान्यांचे RSF नुसारचे ऊसदर ऊस नियंत्रण मंडळाच्या दि.०८/११/२०१७ च्या बैठकीमध्ये सादर करण्यात आले. सद्यस्थितीत १४१ कारखान्यांपैकी ११९ कारखान्यांनी RSF नुसार दर अदा केलेला आहे. २ कारखान्यांचे दर RSF सुत्रानुसार असाधारण निघत असल्याने मंडळाने त्या कारखान्यांनी प्रत्यक्षात अदा केलेल्या ऊसदरास मान्यता दिली आहे. उर्वरीत २०

कारखान्यांनी RSF सुत्रानुसार दर अदा केला नाही. RSF सुत्रानुसार ऊसदर निश्चित करणेसाठी प्रस्ताव सादर न केलेल्या ९ कारखान्यांचे प्रस्ताव प्राप्त झाले असून ते ऊस नियंत्रण मंडळाच्या आगामी बैठकीत सादर करण्यात येत आहेत.

(४) RSF सुत्रानुसार निघणाऱ्या दराप्रमाणे थकबाकी असणाऱ्या कारखान्यांना सदर थकबाकी अदा करणेबाबत साखर आयुक्त यांनी दि. १३/१२/२०१७ रोजी ने आदेशित केले आहे.तसेच थकबाकी असणाऱ्या कारखान्यांचा अहवाल सादर करण्यास प्रादेशिक सहसंचालक (साखर) यांना दि.०४/०१/२०१८ व दि. १८/०४/२०१८ चे पत्रान्वये साखर आयुक्त यांनी सूचित केले असून दि.०१/०९/२०१८ चे पत्रान्वये कारवाई सुचक अहवाल सादर करण्याबाबत कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## घणसोली, तळवली, गोठवली, राबाडा इ.गावांत स्वतंत्र सब स्टेशन होणेबाबत

**(१९) ९५६२३ (०१-०१-२०१८). श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घणसोली, घणसोलीगाव, तळवली गाव, गोठवली गाव, राबडा गाव या परिसरात वारंवार वीज खंडित होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिसरातील विजेची समस्या दूर करण्यासाठी स्वतंत्र सब स्टेशन उभारण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी माहे जून, २०१७ मध्ये मा.ऊर्जा मंत्री महोदयांकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच सदर परिसरात स्वतंत्र सब स्टेशन कधीपर्यंत सुरु होणे अपेक्षित आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-१०-२०१८) :** (१) घणसोली गांव व त्यांचा आजूबाजूचा परिसर जलद गतीने विकसित होत असून वीजेची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. घणसोली फिडरची लांबी अंदाजे १४ किमी असून त्यावर सध्या अतिरिक्त लोड असल्यामुळे तळवली भागातील ग्राहकांना खंडीत होणाऱ्या वीज पुरवठयाच्या समस्येस सामोरे जावे लागत आहे.

(२) याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(३) व (४) घणसोली परिसरात स्वतंत्र उपकेंद्र उभारण्यासाठी लागणाऱ्या जागेची मागणी सिडको कार्यालयास महावितरणच्या क्षेत्रिय कार्यालयाद्वारे करण्यात आलेली आहे. जागा प्राप्त होताच त्याठिकाणी नवीन उपकेंद्र प्रस्तावित करण्यात येईल.

---

**सावर्डे बुद्रुक चौडाळा (ता.कागल, जि.कोल्हापूर) परिसरातील शेतकऱ्यांना मीटर जोडणी देण्यात आलेली नसल्याबाबत**

**(२०) ९६०३७ (२९-१२-२०१७). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावर्डे बुद्रुक चौडाळा (ता.कागल, जि.कोल्हापूर) परिसरातील शेतकऱ्यांनी सुमारे ४ महिन्यांपूर्वी शेतीसाठी पंपासाठी कागदपत्रांची पूर्तता व मिटरसाठी लागणारी आगाऊ रक्कम भरुन देखील अद्याप त्यांना मीटर जोडणी देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज वितरण कंपनीच्या बेजबाबदार कारभारामुळे कागल शहर व परिसरातील (जि. कोल्हापूर) पाचशेहून अधिक घरगुती, शेती आणि औद्योगिक ग्राहकांना गेल्या चार-पाच महिन्यांपासून मागणी करुनदेखील विजेची मीटर मिळत नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१०-१०-२०१८) :** (१) व (२) कोल्हापूर जिल्हयामध्ये सन २०१७-१८ मध्ये ४२७२ कृषीपंपाना वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत.

(३) प्रलंबित कृषीपंपाना नवीन उच्चदाब वितरण प्रणाली योजने अंतर्गत वीज जोडण्या देण्याचे काम महावितरण कंपनीमार्फत करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शेतकऱ्यांच्या बुडीत कर्जाचा भार राष्ट्रीयकृत, व्यापारी व सहकारी बँकानी उचलण्याच्या प्रस्तावास बँकानी मान्यता दिल्याबाबत.**

**(२१) ९६१०१ (०६-०१-२०१८). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांच्या बुडीत कर्जाचा ७० टक्के भार राष्ट्रीयकृत, व्यापारी व सहकारी बँकानी उचलण्याच्या शासनाच्या प्रस्तावास बँकानी मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे शासनाचे हजार कोटी रुपये वाचणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०४-१०-२०१८) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे. कर्जमाफी योजना राबविताना बुडीत कर्जे असलेल्या कर्जमाफीस पात्र असणाऱ्या शेतकऱ्यांसाठी एक रकमी परतफेड योजनेचा शासनाचा प्रस्ताव राज्यस्तरीय बँकर्स समितीमार्फत सर्व बँकांना पाठविण्यात आला होता. त्यास सर्व संबंधित बँकांनी सहमती दर्शविली असून त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. यामुळे पात्र अर्जदारांच्या बुडीत कर्जाची रक्कम कमी होऊन त्यांना नव्याने कर्ज मिळण्याची वाट प्रशस्त होणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्हयात कृषिपंपाकरिता १२ तास थ्री फेज वीज पुरवठा करण्याबाबत**

**(२२) ९७२६६ (०१-०१-२०१८). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्हयात कृषीपंपाकरिता ८ ते १० तास वीजपुरवठा न करता १२ तास थ्री फेज वीज पुरवठा करण्याच्या सूचना मा. मुख्यमंत्र्यांनी दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजी संबंधित विभागाला दिल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आदेशाची अंमलबजावणी अद्यापही झालेली नसून याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) तद्नुसार यास जबाबदार असणाऱ्यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-१०-२०१८) :** (१), (२) व (३) राज्यात कमी पर्जन्यमान असलेल्या तालुक्यामध्ये कृषी पंपासाठी १२ तासांचा थ्री फेज वीज पुरवठा उपलब्ध करुन देण्याबाबत मा. पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करुन सदर समितीच्या शिफारशीनुसार अतिरिक्त वीज पुरवठा करण्याबाबत शासन निर्णय दिनांक ०७ सप्टेंबर, २०१७ अन्वये दिनांक ३१.१०.२०१७ पर्यत कार्यवाही करण्याच्या सूचना महावितरण कंपनीस देण्यात आल्या होत्या. त्यानुसार मागील वर्षी कार्यवाही झालेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्हयात जिल्हा परिषदेच्या शाळा, अंगणवाडया तसेच आरोग्य केंद्रांकरिता वीज वितरण कंपनीने औद्योगिक दर आकारणी न करता निवासी दर आकारण्याबाबत**

**(२३) ९७८७६ (२९-१२-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयात जिल्हा परिषदेच्या शाळा, अंगणवाडया तसेच आरोग्य केंद्रांकरिता वीज वितरण कंपनीने औद्योगिक दर आकारणी न करता निवासी दर आकारणी करावी असा ठराव पुणे जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीने शासनाकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वीज देयक भरण्यासाठी ४ हप्त्यांऐवजी १० हप्त्यांची मुदत द्यावी असेही या ठरावात नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने या ठरावाची दखल घेतली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-१०-२०१८) :** (१) जिल्हा परिषदेच्या शाळा, अंगणवाडया तसेच आरोग्य केंद्रांकरिता सार्वजनिक सेवा (शासकीय) या वर्गवारीनुसार वीज बिलाची आकारणी करण्यात येते. लघुदाब सार्वजनिक सेवा वर्गवारीचे दर हे औद्योगिक तसेच घरगुती वर्गवारीतील दराच्या तुलनेत कमी आहेत.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शेतकऱ्यांचा वीज पुरवठा चुकीच्या पद्धतीने खंडित केला जात असल्याबाबत**

**(२४) ९७९४७ (२९-१२-२०१७). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने माहे जून, २०१५ मध्ये शेती पंप वीज वापर सत्यशोधन समिती गठीत करून या समितीमध्ये श्री. विश्वास पाठक, श्री. प्रताप होगडे, श्री. आशिष चंदाराणा यांची नेमणूक केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या समितीने अहवाल माहे जुलै, २०१७ मध्ये राज्य सरकारच्या एमएसईबीकडे सादर केला असून मा. उर्जामंत्री महोदयांनी शेतकऱ्यांची वीज देयके चुकीच्या पद्धतीने दिली असून ती दुरुस्त करून कमी करण्यात येईल असे सांगितले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जुनी देयके दुरुस्त न करता शेतकऱ्यांचा वीज पुरवठा खंडित करण्याची कारवाई केली जात असून शासनाने याची चौकशी केली आहे काय, त्यानुसार वीज देयके दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१०-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर समितीने दिलेल्या अहवालावर महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने (सूत्रधारी कंपनी) महावितरण कंपनीचे अभिप्राय मागितले होते. महावितरण कंपनीने अभिप्राय सादर केले असून सदरचा अहवाल सूत्रधारी कंपनीच्या विचाराधीन आहे.

(३) वीज बिलाबाबत उपविभागीय कार्यालयास प्राप्त झालेल्या लेखी तक्रारीच्या अनुषंगाने वीज ग्राहकांच्या बिलाच्या तक्रारीचे निरसन करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील यंत्रमाग लघुउद्योजकांना २६६ पैसे प्रतियुनिट या वीज आकारास मान्यता देणेबाबत**

**(२५) ९८२९२ (२९-१२-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील यंत्रमाग लघुउद्योजकांना मार्च, २०१८ पर्यंत २६६ पैसे प्रतियुनिट या वीज आकारास मान्यता द्यावी व ती कायम करावी अशी मागणी मा. ऊर्जामंत्री यांच्याकडे दिनांक ८ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे यंत्रमाग धारकांनी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनाद्वारे शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्याचे स्वरुप काय आहे,
(३) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-१०-२०१८) :** (१) संबंधित निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) शासन निर्णय दिनांक ७.११.२०१५ नुसार वीज दर सवलतीसाठी लघुदाब यंत्रमाग ग्राहकांना देण्यात येणारी अनुदानाची मर्यादा कायम ठेवावयाची असल्याने दिनांक १.११.२०१६ पासून बहुवार्षिक वीजदर आदेशातील वाढीव वीज दर संबंधित ग्राहकांना आकारण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मालेगाव (जि.नाशिक) तालुक्यातील घरगुती मीटर व थ्रीफेज इलेट्रीक मीटर्सची शासन मान्य प्रयोग शाळेकडून तपासणी करण्याबाबत**

**(२६) ९८४२५ (२९-१२-२०१७). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगाव (जि.नाशिक) या तालुक्यातील घरगुती मिटर व थ्रीफेज इलेट्रीक मिटरची शासन मान्य प्रयोग शाळेकडून तपासणी करावी यासाठी लोकप्रतिनिधी व नागरिकांनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक २३ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, घरगुती मिटर व थ्रीफेज इलेट्रीक मिटरची शासन मान्य प्रयोग शाळेकडून तपासणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-१०-२०१८) :** (१) सदर निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

परंतु विद्युत मीटर खरेदी करताना निविदेसोबत आलेल्या नमुना मीटर्सची शासन मान्यता प्रयोग शाळेकडून तपासणी करण्यात येते. ज्या निविदाकारांचे नमुना मीटर्स शासन मान्यता प्राप्त प्रयोगशाळेत तांत्रिक तपासणीत योग्य आढळतात त्यांना पुरवठा आदेश देण्यात येतो. तसेच मीटर्सचा पुरवठा झाल्यानंतर सुध्दा पुरवठा केलेल्या मीटर्सपैकी काही मीटर्सची शासनमान्यता प्राप्त प्रयोगशाळेत तपासणी करण्यात येते.

(२) प्रश्न उद्‍भवत नाही.

(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## पॉवर ग्रीड टॉवर कंपनीच्या तारेखाली असलेल्या सोयाबीनच्या गंज्या आगीमुळे जळून नष्ट झाल्याबाबत

**(२७) ९८६६२ (२७-१२-२०१७). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पॉवर ग्रीड टॉवर कंपनीच्या तारेखाली असलेल्या सोयाबीनच्या गंज्या तारेचे घर्षण होऊन लागलेल्या आगीमुळे जळून नष्ट झालेल्या सोयाबिनची नुकसान भरपाई मिळणेबाबत श्री.भिमराव सिताराम तळेकर, राजेंद भिमराव तळेकर रा.खैरव (ता.सिंदखेड राजा, जि.बुलढाणा) यांनी दिनांक ३० ऑक्टोबर, २०१७ रोजी तहसिलदार सिंदखेडराजा यांच्याकडे अर्ज करुनही अदयापही कोणतीच कार्यवाही झालेली नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती उक्त नुकसानग्रस्त शेतक-यांना भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२५-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) सदर प्रकरणी नियुक्त केलेल्या समितीने प्रत्यक्ष पहाणी करुन दिलेल्या चौकशी अहवालातील शिफारशीनुसार मानवतेच्या व कंपनीच्या सामाजिक जबाबदारीच्या दृष्टीकोनातून संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यास सानुग्रह अनुदान देणेबाबत पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. कंपनीस कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## गडहिंग्लज (जि.कोल्हापुर) तालुक्यातील आप्पासाहेब नलवडे गडहिंग्लज साखर कारखान्यातील कर्मचाऱ्यांची देय रक्कम थकविण्यात आल्याबाबत

**(२८) ९८८७८ (१३-०७-२०१८). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडहिंग्लज (जि.कोल्हापुर) तालुक्यातील आप्पासाहेब नलवडे गडहिंग्लज साखर कारखान्यातील सुमारे २०० कर्मचाऱ्यांची देय रक्कम थकविण्यात आल्याने या कारखान्यातील कर्मचाऱ्यांनी माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान आंदोलन केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील देणी देण्याबाबत साखर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली लवाद नेमण्यात आला असून वारंवार मागणी करूनही लवादाच्या बैठकी होत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त रक्कम थकीत राहील्याने कर्मचाऱ्यांच्या कुटूंबियांची आर्थिक अडचण होत असून लवादाची बैठक घेवून देणी भागविण्याबाबत मार्ग काढण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर देय देणी कर्मचाऱ्यांना अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०४-१०-२०१८) :** (१) होय.
कारखान्याच्या कर्मचाऱ्यांनी देय रक्कम न मिळाल्यामुळे दि.२७.०२.२०१८ ते दि.१.०३.२०१८ दरम्यान उपविभागीय अधिकारी कार्यालय, गडहिंग्लज विभाग, कोल्हापूर यांचे कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले होते.
(२) नाही.
(३) होय.
(४) कर्मचाऱ्यांच्या देय रक्कमा अदा करण्यासंदर्भात साखर आयुक्त कार्यालयाने दि.२७.१०.२०१७ च्या पत्राने संबंधित कंपनीस व कारखान्यास आवश्यक कार्यवाही करणेबाबत कळविले आहे. त्याचप्रमाणे थकीत रक्कम येणे बाबत कामगारांनी औद्योगिक न्यायालय, कोल्हापूर येथे याचिका क्र.ULP No. १२३/२०१५ दाखल केली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) येथील विद्युत तारा व खांब काढण्याच्या कामामध्ये विलंब होत असल्याबाबत**

**(२९) ९८९०० (२९-१२-२०१७). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील प्रशासकीस इमारतीचे बांधकामासाठी विद्युत तारा व खांब काढण्याच्या कामामध्ये कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं मर्या.उल्हासनगर यांच्या कडून विलंब होत असल्याचे माहे ऑक्टेबर, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत सां.बा. विभागाचे अधिकारी व राज्य विद्यूत महामंडळाचे अधिकारी यांनी दिनांक ०५ ऑक्टोबर, २०१७ रोजी संयुक्त पाहणी करून दोन ते तीन दिवसात विद्यूत खांब व तारा हलविण्याचे अंदाजपत्रक तयार करून रक्कम कळविण्यात येईल असे सांगितले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त स्थानांतरण शुल्क भरण्याकरीता उपविभागीय अभियंता, सां.बा.उपविभाग उल्हासनगर यांनी दिनांक १६ ऑक्टोबर, २०१७ रोजी पत्राने रक्कमेची विचारणा केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत सबंधितांकडून कोणती तातडीची कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) महावितरण, कल्याण मंडळ २ कार्यालयाकडून सदर कामासंबंधीचे अंदाज पत्रक दिनांक २१.११.२०१७ रोजी मंजूर झाले आहे. सदर अंदाजपत्रक ग्राहकाधिष्ट वितरण सुविधा (१.३% DDF) या योजनेअंतर्गत मंजूर झाले असून उपविभागीय अभियंता, सा.बां.वि., उल्हासनगर यांचेकडून सदर काम प्रगतिपथावर आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील जीर्ण झालेल्या तारा व खांब बदलण्याबाबत**

**(३०) ९९३४१ (२९-१२-२०१७). श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विद्युत क्षेत्रातील तांत्रिक कामगार युनियन यांनी अपघात टाळण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत ग्रामीण व शहरी भागातील जीर्ण झालेल्या तारा व खांब बदलण्यासाठी माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये राज्यभर आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले,
(३) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) ग्राहकांना दर्जेदार, अखंडीत व सुरळीत वीज पुरवठा मिळावा यासाठी वीज वाहिन्यांची व वीज उपकरणांची देखभाल व दुरुस्तीची कामे करावी लागतात. जळालेल्या/तुटलेल्या केबल बदली/दुरुस्ती करणे, निकामी PSC Polesबदली करणे, तुटलेले Pin आणि Dis Insulators बदलणे, वितरण पेटीचे/लघुदाब वितरण पेटीचे नसलेले दरवाजे बसविणे, AB स्विच बसविणे इत्यादी करीता Maintenances DPR महावितरण कंपनीमार्फत प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगाव जिल्ह्यातील सुमारे ८ हजार ६८९ शेतकरी कृषिपंप जोडणीच्या प्रतीक्षेत असल्याबाबत**

**(३१) ९९७८८ (२९-१२-२०१७). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील सुमारे ८ हजार ६८९ शेतकरी कृषिपंप जोडणीच्या प्रतीक्षेत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतक-यांनी सर्व कागदोपत्री प्रक्रिया पूर्ण करुनही व शुल्क भरूनही निधीअभावी ४ वर्षापासून सदर प्रस्ताव प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे काय,

(३) असल्यास, उक्त शेतक-यांच्या कृषीपंपांच्या जोडण्या त्वरित करणेसाठी शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१०-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) दिनांक ५ मे, २०१८ च्या शासन निर्णयान्वये शासनाने राज्यातील प्रलंबित कृषीपंप वीज जोडण्या देण्याकरिता उच्चदाब वितरण प्रणाली योजना जाहीर केली आहे. या योजनेअंतर्गत प्रलंबित कृषीपंपाना वीज जोडण्या देण्यात येणार आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना प्रलंबित शिष्यवृत्ती व शिक्षण परिक्षा फी देण्याबाबत**

**(३२) १०४७६३ (१९-०४-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमित झनक (रिसोड), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.सुरेश**

**लाड (कर्जत), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या ऑनलाईन सेवांमध्ये तांत्रिक अडचणीमुळे सन २०१७-२०१८ चे शैक्षणिक वर्षातील अनुसूचित जातीतील विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती व शिक्षण फि मिळालेली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण तसेच आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना सदरील अर्ज भरताना सायबर कॅफेमध्ये किमान १०० ते २०० किंवा त्याहीपेक्षा अधीक पैसे दयावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेअंतर्गत रायगड जिल्हयातील २,०६७ विद्यार्थ्याचे अर्ज महाविद्यालय स्तरावर तसेच जिल्हा स्तरावर ६६७ असे एकूण २,७३४ अर्ज प्रलंबित असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सन २०१७-१८ वर्षातील विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती व शिक्षण फि तातडीने देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०५-१०-२०१८) :** (१) अंशत: होय, महाडिबीटी प्रणालीवरील तांत्रिक अडचणींमुळे सन २०१७-१८ वर्षातील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती, फ्रिशिपचे लाभ हे ऑफलाईन पध्दतीने त्यांच्या आधारसंलग्न बॅन्क खात्यावर अदा करण्यास दि.२९.१.२०१८ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

(२) नाही.

(३) अंशत: होय, रायगड जिल्हयातील सन २०१५-१६ व २०१६-१७ अखेर प्रलंबित असलेले सदरील अर्ज माहे मार्च, २०१८ अखेरीस निकाली काढण्यात आले आहेत.

(४) सन २०१७-१८ मध्ये पात्र आढळून आलेले अनुसूचित जाती प्रवर्गातील ४३७९ अर्जापैकी ३७३५ अर्ज निकाली काढण्यात आले असून, उर्वरीत ७२० अर्ज निकाली काढण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**राज्यातील २६ हजार महाविद्यालयांना केंद्र शासनाद्वारे उच्च शिक्षणासाठी देण्यात आलेल्या शिष्यवृत्तीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(३३) १०५२१३ (०४-०४-२०१८). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २६ हजार महाविद्यालयांना केंद्र शासनामार्फत सन २०१० ते २०१५ या कालावधीत उच्च शिक्षणासाठी देण्यात आलेल्या शिष्यवृत्तीमध्ये गैरव्यवहार झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शिष्यवृत्तीच्या गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी स्थापन केलेल्या एस.आय.टी. चा अहवाल शासनाकडे प्राप्त झाल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवालामध्ये किती महाविद्यालये दोषी आढळली आहेत, त्यानुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित महाविद्यालयाविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच, राज्य व केंद्र शासनाच्यावतीने देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीमध्ये गैरव्यवहार होऊ नयेत व सदरची प्रक्रिया पारदर्शक पार पडण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१२-१०-२०१८) :** (१) व (२) अंशत: होय, सन २०१० ते २०१५ या कालावधीत भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेच्या वाटपात सामाजिक न्याय विभागाशी संबंधित १७०४ संस्था व आदिवासी विकास विभागाशी संबंधित १६६३ संस्थांच्या विशेष चौकशी पथकाने केलेल्या लेखापरीक्षणाअंती शिष्यवृत्तीच्या रक्कमेचा गैरव्यवहार झाल्याची बाब विशेष चौकशी पथकाने माहे जुलै,२०१७ मध्ये सादर केलेल्या अंतिम अहवालानुसार निदर्शनास आली.

(३) विशेष चौकशी पथकाच्या अंतिम अहवालानुसार दोषी आढळून आलेल्या संस्थावर नियमानुसार कारवाई करण्याचे व वसुलपात्र रक्कम संबंधित संस्थांकडून वसूल करण्याचे निर्देश आयुक्त, समाजकल्याण पुणे यांच्यामार्फत संबंधित सहायक आयुक्तांना देण्यात आले असून, त्यानुसार पुढील कार्यवाही संबंधित सहायक आयुक्त, समाजकल्याण यांच्यामार्फत सुरु आहे.

(४) राज्य व केंद्र शासनाच्या वतीने देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीमध्ये गैरव्यवहार होऊ नये व सदरची प्रक्रिया पारदर्शक पार पाडण्यासाठी योजनेचा लाभ महा-डिबीटी प्रणालीद्वारे विद्यार्थ्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यावर अदा करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोंढाळी (ता.काटोल, जि.नागपूर) येथील कृषी उत्पन्न उपबाजार समिती बंद असल्याबाबत**

**(३४) १०५२३९ (१९-०४-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोंढाळी (ता.काटोल, जि.नागपूर) येथील कृषी उत्पन्न उपबाजार समिती कित्येक महिन्यांपासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर कृषी उत्पन्न उपबाजार समिती सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२३-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही. कोंढाळी उपबाजार हंगामानुसार सुरू राहतो.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील एम.आय.डी.सी. अग्निशमन विभागात विभागीय अग्निशमन अधिकारी पदावर केले जात असलेल्या नियुक्तीबाबत**

**(३५) १०५४९० (२३-०४-२०१८). श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एम.आय.डी.सी. अग्निशमन विभागात विभागीय अग्निशमन अधिकारी या महत्वाच्या पदावर किंवा या पदाच्या प्रशिक्षणासाठी नियुक्ती करताना मर्जीतील अधिकाऱ्यांची नियुक्ती व प्रशिक्षणासाठी पाठविले जात असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, प्रशिक्षणाचा महामंडळाला सुमारे ३२ लाखाचा भुर्दंड पडला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२९-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.

म.औ.वि. महामंडळाच्या अग्निशमन विभागासाठी १ मुख्य अग्निशमन अधिकारी व अग्निशमन सल्लागार, १ सह मुख्य अग्निशमन अधिकारी, १ उप मुख्य अग्निशमन अधिकारी, ५ विभागीय अग्निशमन अधिकारी व ३० अग्निशमन केंद्र अधिकारी ही पदे मंजूर असून, महाराष्ट्र आग प्रतिबंधात्मक व जीव संरक्षण उपाययोजना २००६ नुसार अग्निशमन सेवेमध्ये नामनिर्देशित अधिकारी म्हणून काम करण्यासाठी केंद्र शासनाच्या गृह विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांचा विभागीय अग्निशमन अधिकारी पाठ्यक्रम पुर्ण करणे आवश्यक आहे. त्यामुळे अग्निशमन केंद्र अधिकारी यांना सेवा ज्येष्ठतेनुसार या पाठ्यक्रमासाठी महामंडळामार्फत पुरस्कृत करण्यात येते. यामध्ये कुठल्याही वरिष्ठ अधिकाऱ्याच्या मर्जीप्रमाणे या पाठ्यक्रमासाठी पाठविण्यात येत नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रामटेक (जि.नागपूर) तालुक्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीचे मुख्य प्रशासक हे पद परवानगी न घेता भरल्याबाबत

**(३६) १०५५२६ (२०-०४-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक (जि.नागपूर) तालुक्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीचे मुख्य प्रशासक हे पद एका खासगी अनुदानित शाळेतील सहाय्यक शिक्षकाने कुठलीही परवानगी न घेता घेतल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०४-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.

दि.१६ डिसेंबर २०१७ च्या आदेशान्वये रामटेक कृषी उत्पन्न बाजार समितीवर श्री.अनिल कोल्हे "सहायक शिक्षक" यांची मुख्य प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आलेली आहे.

(२) होय. चौकशीचे आदेश दिले

(३) चौकशीत श्री.अनिल कोल्हे, मुख्य प्रशासक, कृषी उत्पन्न बाजार समिती, रामटेक हे शेतकरी असल्याचे व त्यांच्याकडे २.९८ हे. शेत जमीन असल्याचे व ते शेतकरी असल्याचे दिसून आले असून त्यांनी शपथपत्रात शासकीय सेवेत कार्यरत नाहीत असे नमूद करून मुख्य व्यवसाय शेती असल्याचे नमूद केले आहे. तथापि, चौकशीत श्री.कोल्हे हे राष्ट्रीय आदर्श विद्यालय, रामटेक या खाजगी अनुदानीत शाळेत सहायक शिक्षक या पदावर दि.५.११.१९९८ पासून कार्यरत आहेत व त्यांना शासन नियमाप्रमाणे वेतन व भत्ते मिळतात असे दिसून आले आहे.

सदर चौकशीच्या अनुषंगाने दि.२५ एप्रिल, २०१८ च्या आदेशान्वये श्री.कोल्हे यांची नियुक्ती रद्द करण्यात आलेली आहे. सदर आदेशाविरूद्ध संबंधीतांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका दाखल केली असून त्याबाबत मा.न्यायालयांनी अंतरिम आदेश दिले आहेत. सदर प्रकरण सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ठाकूर व्हिलेज आणि अशोक वन शाखेत आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(३७) १०६४४० (२३-०४-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ठाकूर व्हिलेज आणि अशोक वन शाखेत एक कोटी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०४-१०-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
बँकेच्या या शाखांमधील काही कर्ज प्रकरणांत अनियमितता आढळल्या आहेत.
(२), (३) व (४) अनियमित कर्ज मंजूरी प्रकरणांपैकी काही कर्ज मंजूरी बँकेच्या संचालक मंडळाच्या मान्यतेने झाली नाहीत. सदर कर्जे शाखा व्यवस्थापकांनी त्यांना बँकेने प्रदान केलेल्या अधिकारांत मंजूर केली आहेत. बँकेच्या दक्षता विभागाने केलेल्या तपासणी अहवालाच्या अनुषंगाने बँकेचे अशोकवन शाखेचे व्यवस्थापक श्री.एस.बी.विचारे व सी.ए.खानविलकर, ठाकूर व्हिलेज शाखेचे व्यवस्थापक यांना बँकेने दिनांक १४/११/२०१७ च्या आदेशान्वये निलंबित केले असून खातेनिहाय चौकशी करण्यात आली आहे. चौकशी अहवाल संचालक मंडळ सभेपुढे सादर करण्यात येत आहे. अनियमितता प्रकरणातील रू.२२.५० लाख कर्ज भरणा करण्यात आले असून दिनांक ३१/०३/२०१८ अखेर कर्ज वसूलीची रक्कम रू.३६.९१ लाख शिल्लक आहे.

---

**राज्यातील बँकानी शेतकऱ्यांना कर्ज नाकारु नये या आदेशाच्या अंमलबजावणीबाबत**

**(३८) १०७९१८ (२३-०४-२०१८). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बँकाना कर्जवाटपासाठी ठरवून दिलेली उद्दिष्टप्राप्तीची मर्यादा ही कमीत कमी असल्याने कोणत्याही शेतकऱ्यांना बँकानी कर्ज नाकारु नये असे आदेश सहकारी व पणन मंत्री यांनी दिनांक ५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास अहमदनगर जिल्हाधिकारी कार्यालय येथे झालेल्या आढावा बैठकीत दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बैठकीत कोणकोणत्या बाबींवर चर्चा करण्यात आली आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०४-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर बैठकीत खालीलप्रमाणे एकूण १३ विषयांवर चर्चा करण्यात आली.

i) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना.

ii) १००% खातेदारांना विकास संस्थांचे सभासदत्व देण्याबाबत.

iii) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कामकाजाचा आढावा.

iv) सहकार क्षेत्रात नाविन्यपूर्ण सहकारी संस्थांची स्थापना करण्याबाबत.

v) बेकायदेशीर सावकारी प्रकरणी कारवाई करणेबाबत.

vi) सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षण कामकाजाचा आढावा.

vii) शेतमाल तारण योजनेची अंमलबजावणी.

viii) किमान आधारभूत योजनेअंतर्गत मूग, उडीद व सोयाबीन खरेदीचा आढावा.

ix) किमान आधारभूत योजनेअंतर्गत तूर खरेदीची पूर्वतयारी व गोदामाची उपलब्धता.

x) शेतकरी - ग्राहक बाजार उपक्रम अंमलबजावणीचा आढावा.

xi) अटल महापणन विकास अभियान आढावा.

xii) महारेशीम अभियान.

xiii) अधिकारी व कर्मचारी यांच्या अडी-अडचणीबाबत आढावा.

(३) जिल्हा उपनिबंधक, अहमदनगर यांनी वरीलपैकी १ ते ११ बाबींवर कार्यवाही केलेली असून त्यांच्या स्तरावर विषयनिहाय आढावा वेळोवेळी घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील खाजगी व स्वयंअर्थ सहाय्यित विद्यापीठात अनुसूचित जाती/जमातीच्या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती मिळण्याबाबत

**(३९) १०८५३९ (१७-०४-२०१८). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी व स्वयंअर्थ सहाय्यीत विद्यापीठात अनुसूचित जाती / जमातीच्या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती मिळण्याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत कार्यवाही करण्याची बाब विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१२-१०-२०१८) :** (१) नाही.
(२) राज्यातील मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये केंद्रभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना राज्य शासनाची शिक्षण शुल्क परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना अनुज्ञेय आहे. सदरहू योजना खाजगी स्वयंअर्थसहाय्यीत विद्यापीठे व खाजगी अभिमत विद्यापीठांना लागू नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दि ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या विभाजनाबाबत**

**(४०) १०९४८३ (१९-०४-२०१८). श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्हा निर्मितीला तीन वर्षे पूर्ण होऊनही अद्याप दि ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे विभाजन झालेले नसल्याचे दिनांक ६ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर बँकेचे विभाजन होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१८-०८-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) होय, ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक विभाजनाबाबत बँकेच्या संचालक मंडळाने बँक विभाजनाचा प्रत्यक्ष प्रस्ताव मंजूर केला नाही. दि.३१/०३/२०१८ अखेरच्या लेखापरीक्षण अहवालासह परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना बँकेस दिलेल्या आहेत.
बँकेचे दि. ३१/०३/२०१८ अखेरचे लेखापरिक्षण सुरू असून तद्नंतर बँकेकडून विभाजनाचा प्रस्ताव दाखल करण्यात येईल असे बँकेने कळविलेले आहे.
(४) बँक विभाजनाचा प्रस्ताव अद्याप प्राप्त झाला नसल्याने पालघर जिल्हा सहकारी बँक निर्मितीबाबत कार्यवाहीस विलंब होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई कृषी उत्पन्नत बाजार समितीतील पेठांमध्ये सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४१) १०९५४९ (२०-०४-२०१८). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीतील पाचही बाजारपेठांमध्ये सोयी-सुविधा नसल्याने माथाडी कामगारांनी प्रशासकांच्या दालनात आंदोलन केल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने अधिकची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०४-१०-२०१८) :** (१)हे खरे आहे.

(२) व (३) सदर आंदोलनाच्या वेळी आंदोलकांनी धान्य बाजार आवार येथील खराब झालेले रस्ते, संरक्षण भिंतीचे पुनर्बांधकाम व सार्वजनिक मुतारीबाबतचे मुद्दे उपस्थित केले.बाजार समितीतील घनकचरा व्यवस्थापन विभाग व अभियांत्रिकी विभागाकडून तत्परतेने कार्यवाही होत नसल्याचे लक्षात घेऊन अधिक्षक अभियंता व वरीष्ठ स्वच्छता निरिक्षक यांना निलंबित करून त्याची चौकशी आदेशित केली.

अधिक्षक अभियंता याचेवर ठेवण्यात आलेल्या आरोपांची चौकशी करण्याकरीता सहकार विभागातील निवृत्त विशेष निबंधक तथा माजी पणन संचालक यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली असून, चौकशी अधिकाऱ्यामार्फत सुनावणी चालू असून चौकशीचे कामकाज सुरू आहे.

तसेच वरीष्ठ स्वच्छता निरीक्षक यांच्यावर ठेवण्यात आलेल्या आरोपांची चौकशी करणेकरीता सहकार विभागातील उपनिबंधक यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात येऊन, चौकशी अहवालातील शिफारशीनुसार वरीष्ठ स्वच्छता निरीक्षक यांचेवर मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सेवानियमातील तरतूदीनुसार ताकीद देऊन त्यांचे सेवापुस्तकात नोंद घेण्यात आली आहे आणि त्यांना दि.२०.४.२०१८ पासून कामावर हजर करून घेण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्हयातील पेण अर्बन बँकेच्या बोगस कर्जदारांवर कारवाई करण्याबाबत**

**(४२) ११०७३० (२३-०४-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिपक चव्हाण**

**(फलटण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील पेण अर्बन बँकेच्या बोगस कर्जदारांवर कोणतीही कारवाई केली जात नसल्याची माहिती पणन विभागाच्या अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.सहकार मंत्री यांच्या उपस्थित झालेल्या बैठकीवेळी निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व

(३) त्यानुसार संबंधित बोगस कर्जदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच पेण बँकेच्या सर्वसामान्य ठेवीदारांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०४-१०-२०१८) :** (१) नाही.

(२) व (३) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दिनांक १७.१०.२०१५ च्या आदेशांनुसार शासनाने दिनांक १६.१२.२०१५ च्या आदेशांन्वये बँकेच्या वसुलीचे संनियंत्रण व अनुषंगीक कामकाजासाठी जिल्हाधिकारी, रायगड यांच्या अध्यक्षतेखाली विशेष कृती समितीची नेमणूक केली आहे. विशेष कृती समितीच्या सूचनेनुसार बँकेतील १२८ बोगस कर्जखात्यांचा तपास करण्यासाठी नेमण्यात आलेल्या तपास पथकास सहाय्य करण्यासाठी १ विशेष लेखा परिक्षक व ४ लेखापरिक्षकांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

वरील बोगस खात्यांच्या तपासामधून जप्त करण्यात आलेली रक्कम रु.२.१८ कोटी जिल्हा सत्र न्यायालय, अलिबाग येथे जमा करण्यात आली असून सदर रक्कम बँकेकडे वर्ग करण्यासाठी विशेष कृती समितीच्या सूचनेनुसार कार्यवाही सुरु आहे. सदर सूचनेनुसार सक्षम अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, अलिबाग यांनी तत्कालीन संचालकांच्या मालमत्तांवर एमपीआयडी कायदा, १९९९ अंतर्गत कार्यवाही सुरु केली आहे. सध्या ३९ मालमत्ता जप्त करण्यात आलेल्या आहेत.

विशेष कृती समितीच्या सूचनेनुसार बँकेकडील उपलब्ध निधीतून जास्तीत जास्त ठेवीदारांना ठेवी वाटप करण्यासाठी मा. उच्च न्यायालय ,मुंबई यांचेकडे विनंती केली असून मा. उच्च न्यायालयाने दिनांक २८.४.२०१७ रोजी दिलेल्या आदेशानुसार बँकेच्या सर्व शाखांमधून रु. १०,०००/- ते रु. २५,०००/- इतक्या रक्कमेच्या ठेवी असणाऱ्या ठेवीदारांना रक्कम वाटप करण्याचे कामकाज सुरु असून दि. २७.६.२०१७ पासून दि. २८.०२.२०१८ पर्यंत ८९६७ ठेवीदारांना रक्कम रु.११ कोटी ५९ लाख वाटप करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

**राज्यातील कार्यरत उद्योगांमध्ये स्थानिकांना ८० टक्के रोजगार देण्याबाबत**

**(४३) ११०७३९ (१२-०४-२०१८). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कार्यरत उद्योगांमध्ये स्थानिकांना (भूमिपुत्रांना) नोकऱ्या देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असल्याचे दिनांक ६ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिकांना रोजगार न देणाऱ्या उद्योगांच्या आर्थिक सवलती देखील बंद करण्याचा निर्णय घेऊन अंमलबजावणीसाठी उद्योग व कामगार विभागातील अधिकाऱ्यांच्या समावेश करून एक कक्ष स्थापन करण्याचा निर्णय देखील याच सुमारास घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्यापपर्यंत राज्यातील किती उद्योगांमध्ये ८० टक्के स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आला आहे,

(४) नसल्यास, ८० टक्के रोजगार उपलब्ध करून न देणाऱ्या उद्योगांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०८-१०-२०१८) :** (१) व (२) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक स्थालोरो-२०१८/प्र.क्र.९३/उद्योग-६, दिनांक १७ नोव्हेंबर, २००८ अन्वये औद्योगिक विकासातून राज्यातील स्थानिक लोकांना जास्तीत जास्त रोजगार मिळावा या दृष्टीकोनातून राज्यातील सर्व औद्योगिक घटकामध्ये/उपक्रमामध्ये पर्यवेक्षकीय श्रेणीत किमान ५० टक्के व पर्यवेक्षकीय सहीत इतर श्रेणीत किमान ८०टक्के स्थानिक लोकांना नोकऱ्यामध्ये प्राधान्याने घेण्याबाबत तसेच नोकर भरती करणारा अधिकारी मराठी जाणणारा असावा अशा धोरणाची अंमलबजावणीबाबत कार्यपध्दती निर्गमित करण्यात आलेली आहे.

जिल्हा उद्योग केंद्रामार्फत नव्याने स्थापित होणाऱ्या/विस्तारीकरण उद्योग घटकांना सामुहिक प्रोत्साहन योजने अंतर्गत विविध प्रोत्साहने मंजूर करताना स्थालोरो-१ या विहित नमुन्यात दिनांक ३० जून पर्यंत विवरणपत्र सादर करणे बंधनकारक केले आहे.

(३) व (४) माहे जुलै २०१८ अखेर मोठे व विशाल उपक्रम ( संख्या २,५४२) मध्ये पर्यवेक्षकीय श्रेणीत २,०३,२७० तर पर्यवेक्षकीय सहीत इतर श्रेणीत ७,२९,५२० असा एकूण ८,२६,९१६ इतक्या स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आला असून त्याची टक्केवारी ८४% अशी आहे.

सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम (संख्या २,३१,७४८) मध्ये पर्यवेक्षकीय श्रेणीत ६,१३,७३१ तर पर्यवेक्षकीय सहीत इतर श्रेणीत २२,०७,३७६ असा एकूण २७,२७,१४० इतक्या स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आला असून त्याची टक्केवारी ९५% अशी आहे.

उपरोक्त आकडेवारी नुसार राज्यातील औद्योगिक उपक्रमांमध्ये स्थानिक लोकांची टक्केवारी शासन निर्णय दिनांक १७.११.२००८ मध्ये नमूद व विहित टक्केवारीची पूर्तता करीत असल्याचे स्पष्ट आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयात स्थानिक बेरोजगार तरुणांना रोजगार देण्याबाबत**

**(४४) ११०९९८ (२०-०४-२०१८). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने राज्यात सुरु असलेल्या उद्योगांमध्ये स्थानिकांना (भूमिपुत्रांना) नोकऱ्या देण्याचा निर्णय घेतला असल्याचे दिनांक ६ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्येक जिल्हयात उद्योग व कामगार विभागातील अधिकाऱ्यांचा स्वतंत्र कक्ष स्थापन करण्याचा निर्णय माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कक्षामार्फत नाशिक जिल्हयासह राज्यातील किती उद्योगांमध्ये ८० टक्के स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आला तसेच या धोरणाची अंमलबजावणी करण्यास नकार देण्याऱ्या राज्यातील एकूण किती उद्योगांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०८-१०-२०१८) :** (१) व (२) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक स्थालोरो-२०१८/प्र.क्र.९३/उद्योग-०६, दिनांक १७ नोव्हेंबर, २००८ अन्वये औद्योगिक विकासातून राज्यातील स्थानिक लोकांना जास्तीत जास्त रोजगार मिळावा या दृष्टीकोनातून राज्यातील सर्व औद्योगिक घटकामध्ये/उपक्रमामध्ये पर्यवेक्षकीय श्रेणीत किमान ५० टक्के व पर्यवेक्षकीय सहीत इतर श्रेणीत किमान ८० टक्के स्थानिक लोकांना नोकऱ्यामध्ये प्राधान्याने घेण्याबाबतए तसेच नोकर भरती करणारा अधिकारी मराठी जाणणारा असावा अशा धोरणाची अंमलबजावणीबाबत कार्यपध्दती निर्गमित करण्यात आलेली आहे.

जिल्हा उद्योग केंद्रामार्फत नव्याने स्थापित होणाऱ्या/विस्तारीकरण उद्योग घटकांना सामुहिक प्रोत्साहन योजने अंतर्गत विविध प्रोत्साहने मंजूर करताना स्थालोरो-१ या विहित नमुन्यात दिनांक ३० जून पर्यंत विवरणपत्र सादर करणे बंधनकारक केले आहे.

(३) माहे जुलै २०१८ अखेर मोठे व विशाल उपक्रम ( संख्या २,५४२) मध्ये पर्यवेक्षकीय श्रेणीत २,०३,२७० तर पर्यवेक्षकीय सहीत इतर श्रेणीत ७,२९,५२० असा एकूण ८,२६,९१६ इतक्या स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आला असून त्याची टक्केवारी ८४% अशी आहे.

सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम (संख्या २,३१,७४८) मध्ये पर्यवेक्षकीय श्रेणीत ६,१३,७३१ तर पर्यवेक्षकीय सहीत इतर श्रेणीत २२,०७,३७६ असा एकूण २७,२७,१४० इतक्या स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आला असून त्याची टक्केवारी ९५% अशी आहे.

उपरोक्त आकडेवारी नुसार राज्यातील औद्योगिक उपक्रमांमध्ये स्थानिक लोकांची टक्केवारी शासन निर्णय दिनांक १७.११.२००८ मध्ये नमूद व विहित टक्केवारीची पूर्तता करीत असल्याचे स्पष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

___________

**कोल्हापूर जिल्हयातील २४२३ संस्थांचे लेखापरिक्षण न झाल्याने नोंदणी रद्द करण्यात आल्याबाबत**

**(४५) १११७४९ (२०-०४-२०१८). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील २४२३ संस्थांची पाच वर्षापेक्षा अधिक काळ लेखापरिक्षण न झाल्याने शासनाने दिलेल्या आदेशानुसार नोंदणी रद्द करण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयातील मागासवर्गीय संस्थांमध्ये सुमारे ५०० कोटींचा गैरव्यवहार झाला असून या सर्व संस्थांचे लेखापरिक्षण केल्यानूसार ३० संस्थांमध्ये गैरव्यवहार झाल्याचे नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित गैरव्यवहार करणाऱ्या संस्थांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०३-१०-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) कोल्हापूर जिल्ह्यातील ४७ मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्थांचे चाचणी लेखापरीक्षण आदेश पारीत करण्यात आले होते. त्यापैकी आतापर्यंत गैरव्यवहार / अपहार निदर्शनास आलेल्या १० मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्थांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत व १७ संस्थांवर प्रशासकीय स्वरुपाची कारवाई करण्यात आलेली आहे. १२ संस्थांची प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. उर्वरीत ८ प्रकरणी कारवाई चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील खातेधारकांच्या ठेवी परत देण्याबाबत**

**(४६) ११४७२८ (२३-०४-२०१८). डॉ.पंकज भोयर (वर्धा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्ह्यातील मध्यवर्ती सहकारी बँकेतील दोन लक्ष वीस हजार खातेधारकांच्या ठेवी बँकेत अडकून पडल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खातेदारांची ठेवी प्रलंबित असल्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने खातेदारांच्या ठेवी अडकून पडल्याबाबत संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच सदर खातेदारांच्या ठेवी परत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१२-१०-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित वर्धा बँकेमध्ये एकूण ठेवीदार २,१७,५३८ असून एकूण ठेवीची रक्कम रूपये ३५८.७० कोटी आहे.

(२) बँक आर्थिक अडचणीत असल्यामुळे ठेवीदारांच्या मागणीप्रमाणे ठेवी परत करण्याकरीता बँकेकडे पुरेसा निधी उपलब्ध नाही.

(३) मे.होमट्रेड कंपनीच्या रोख्यांमध्ये बँकेने गुंतविलेली रक्कम रूपये २५ कोटी परत न मिळाल्यामुळे तसेच जिल्ह्यातील काही सहकारी साखर कारखाने तसेच सूतगिरण्यांना दिलेली कर्जे थकीत झाल्यामुळे रोख तरलतेची कमतरता निर्माण होऊन बँक आर्थिक अडचणीमध्ये आली व ठेवीदारांच्या ठेवी परत करू शकली नाही.

सदर कारणांपैकी मे.होमट्रेड कं. रोखे गैरव्यवहार प्रकरण सद्यस्थितीत मा.सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे व सहकारी संस्थांकडील थकीत कर्जप्रकरणी बँकेच्या तत्कालीन संचालक मंडळाविरूध्द कायदा कलम ८८ अंतर्गत जबाबदारी निश्चित करण्याकरीता चौकशी आदेश निर्गमित केले होते. परंतु सदर कायदा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ८८ चा चौकशी आदेश तत्कालीन मा.मंत्री (सहकार) यांनी रद्द केलेला आहे.

त्यामुळे ठेवीदारांच्या ठेवी बँकेमध्ये अडकून पडणे किंवा ठेवीदारास परत न मिळणे या बाबी बँक आर्थिक अडचणीमध्ये आल्यामुळे झालेल्या आहेत व त्याकरीता कारणीभूत असलेल्या बाबींच्या चौकशीकरीता नियमानुसार यथायोग्य कार्यवाही केलेली आहे.

(४) वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने निधींच्या उपलब्धतेनुसार ठेवीदारांना ठेवी परत करण्याबाबत शासन नियुक्त प्राधिकृत अधिकारी समितीच्या सभेमध्ये खालीलप्रमाणे धोरण निश्चित केलेले आहे.

बँकेच्या प्राधिकृत अधिकारी समितीच्या दिनांक ०६/१०/२०१६ रोजीच्या धोरणानुसार प्रथम १० टक्के किंवा जास्तीतजास्त रूपये ३००००/- यापैकी कमी असेल ती रक्कम -

दिनांक ०८/०३/२०१७ रोजीच्या धोरणानुसार पुन्हा १० टक्के व जास्तीत जास्त रूपये ३००००/- यापैकी कमी असेल ती रक्कम दिनांक ०५/०७/२०१७ रोजीच्या धोरणानुसार ५ टक्के व जास्तीत जास्त १५०००/- एवढी रक्कम व मुदती ठेवीवर २५ टक्के व जास्तीत जास्त रूपये ६००००/- पर्यंत कर्ज देण्यात येत आहे.

दिनांक ०७/०२/२०१८ चे नविन धोरणानुसार खातेदारांना ४० टक्के रक्कम किंवा १ लाख यापैकी जी कमी असेल त्या रक्कमेची उचल देणे सुरू आहे.

तसेच सहकारी संस्था यांना १० टक्के किंवा ५ लाख यापैकी जी कमी असेल त्या रकमेची उचल देणे सुरू आहे.

(५) बँकेकडे निधींच्या उपलब्धतेप्रमाणे तसेच प्राधिकृत समितीच्या धोरणानुसार ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यात येत आहेत. त्यामुळे ठेवी वाटप करतांना विलंब झाल्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे करवंजी (ता.लोहारा, जि.उस्मानाबाद) येथील शेतकऱ्याचा तूर विक्री केंद्रावर झालेला मृत्यु**

**(४७) ११७१५५ (२६-०७-२०१८). श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करवंजी (ता.लोहारा, जि.उस्मानाबाद) येथील शेतकरी श्री.रावसाहेब शिवराम हके (वय ६५) याचे लोहरा येथील तूर हमी केंद्रावर तूर विकण्यासाठी गेले असता दिनांक २२ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास कृषी उत्पन्न समितीच्या दुकानाजवळच निधन झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार याप्रकरणी मयत शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना / वारसांना आर्थिक मदत मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०३-१०-२०१८) :** (१) व (२) नाही.

करवंजी, ता.लोहारा, जि.उस्मानाबाद येथील शेतकरी श्री.रावसाहेब शिवराम हके यांनी तूरीची विक्री करण्याकरिता दिनांक २५/०२/२०१८ रोजी नोंद केली होती. दिनांक २२/०३/२०१८ रोजी त्यांनी त्यांचा शेतमाल इतर शेतकऱ्यांसह एकाच वाहनात विक्रीसाठी आणला होता. श्री.हके यांच्या शेतमालाची खरेदी त्याच दिवशी झाली होती.

श्री.हके, यांचा मृत्यू खरेदी केंद्रावर झालेला नसून त्यांच्या शेतमाल खरेदी झाल्यानंतर कृषि उत्पन्न बाजार समितीच्या आवारात झालेला आहे.

वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या शवविच्छेदन अहवालानुसार श्री. हके, यांचा मृत्यू हृदय-विकाच्या झटक्यामुळे झालेला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात शेतमालाची आधारभूत किंमतीपेक्षा कमी दराने विक्री करावी लागल्यामुळे शेतक-यांना आर्थिक नुकसान झाल्याबाबत**

**(४८) ११८५२७ (२६-०७-२०१८). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सोयाबीन, उडीद, तूर आणि हरभरा आधारभूत किंमतीपेक्षा कमी दराने विकावा लागल्यामुळे विदर्भ व मराठवाडयातील आत्म्हत्याग्रस्त भागातील शेतकऱ्यांना सुमारे ५ हजार कोटींचे आर्थिक नुकसान सहन करावे लागले असल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर्षी शेतकरी विषबाधा, गुलाबी बोंडअळी, अत्यल्प पावसाने मेटाकुटीस आलेला असताना नाफेडचे त्रासदायक निकष गोदामांचे व चुका-यांचे शुन्य नियोजन, व्यापारीधार्जीणे धोरण यामुळे आधारभूत किंमती मिळाल्या नसून राज्यातील शेतकऱ्यांना हजारो कोटीचे आर्थिक नुकसान सहन करावे लागले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शेतकऱ्यांना शेतमालाच्या किंमतीला हमीभाव देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०३-१०-२०१८) :** (१) नाही.
(२) राज्यात किमान आधारभूत किंमत दराने मूग व उडीदाची खरेदी दिनांक१३/१०/२०१७ पासून व सोयाबीनची खरेदी दिनांक १५/१०/२०१७ पासून सुरु करण्यात आली होती.हंगाम २०१७-१८ मध्ये किमान आधारभूत किंमत राज्यात झालेली खरेदी पुढीलप्रमाणे आहे:-

| पिक | एकूण खरेदी (क्विं.) | लाभार्थी शेतकरी |
|---|---|---|
| मूग | ५४,३४१.५० | ११,२८८ |
| उडीद | ५,८६,६३९.४८ | ८०,६५४ |
| सोयाबीन | २,६२,८३८.४६ | १८,३०९ |
| तूर | ३३,६७,१७७.४८ | २,६५,८५४ |
| हरभरा | १९,४७,२६२.८९ | १,३९,१९२ |

(३) शेतमालाचा हमीभाव जाहिर करणे ही केंद्रशासनाच्या अखत्यारितील बाब आहे. खरीप व रब्बी हंगामाच्या सुरुवातीला शेतमालाचे हमीभाव केंद्रशासन जाहिर करते ते सर्व राज्याला लागू असतात.राज्य कृषि मुल्य आयोगाकडुन याबाबतच्या शिफारशी केंद्रीय कृषि मुल्य आयोगाकडे केल्या जातात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### रा.नान्हा मांगली (ता.कामठी, जि.नागपूर) येथील एका शेतकऱ्याचे कर्जमाफीच्या यादीत नाव समाविष्ट करण्याबाबत

**(४९) १२२३४९ (२८-०७-२०१८). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रा.नान्हा मांगली (ता.कामठी जि.नागपूर) येथील श्री.माधवराव तुळशीराम करडभाजने यांचे कर्जमाफीच्या यादीत नाव समाविष्ट करून त्यांना संपूर्ण कर्जमाफी करून रक्कम खात्यात जमा करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सहकार मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वान्वये मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कर्जमाफीची रक्कम खात्यात जमा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०४-१०-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) सदर प्रकरणी शासनाने केलेल्या चौकशीन्वये पंजाब नॅशनल बँक, शाखा खडोदा यांनी दिनांक ०७/०४/२०१८ रोजी रूपये १,३८,०००/- इतकी रक्कम श्री. माधवराव तुळशीराम करडभाजणे, रा. नान्हा मांगली, ता.कामठी, जि.नागपूर यांच्या खात्यात जमा केली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कुर्की-पुरनाड ( ता.मुक्ताईनगर जि.जळगाव) येथे १३२ केव्हीए उपकेंद्र कार्यान्वित करण्याबाबत**

**(५०) १२४०७५ (२८-०७-२०१८). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुर्की-पुरनाड (ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव) येथे वीज पुरवठा वारंवार खंडित होत असल्याने प्रस्तावित १३२ के.व्ही.ए. उपकेंद्राचे काम राज्य पारेषण उपक्रमाच्या आराखड्यात समाविष्ट करण्याबाबत कार्यवाही सुरु करण्यात आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तावित उपकेंद्राचे काम पूर्ण झाले आहे काय,

(३) नसल्यास, कधीपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (११-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) कर्की येथे १३२/३३ के.व्ही. उपकेंद्र उभारण्याच्या प्रस्तावाचा राज्य पारेषण उपक्रमाच्या पंचवार्षिक आराखडयात (सन २०२२-२३) समावेश करण्यात आला असून उपकेंद्राच्या प्रस्तावास महापारेषण कंपनीने प्रशासकीय मान्यता दिली आहे. उपकेंद्राचा सविस्तर प्रकल्प अहवाल महाराष्ट्र वीज नियामक आयोगास सादर करण्यात आला होता. त्यावर वीज नियामक आयोगाने सदर अहवालामध्ये काही त्रुटी दर्शविलेल्या आहेत. सदर त्रुटींची पूर्तता करुन त्यास महाराष्ट्र वीज नियामक आयोगाची तत्वत: मान्यता प्राप्त झाल्यावर उपकेंद्र उभारण्याच्या दृष्टीने पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.